# प्रेसनोट

दि.११/११/२०२१

## पुणे महानगरपाकीकेच्या नगर रोड वॉर्ड ऑफीसमधील आरोग्य निरीक्षक व खाजगी इसमावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७,१२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३२ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | आरोपी (१) लोकसेवक - स्वप्नील भगवान कोठावळे, वय - ३२ वर्षे, पद - आरोग्य निरीक्षक, पुणे महानगरपालीका<br>(२) खाजगी इसम - प्रकाश दौलत वाघचौरे, वय – ५६ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- (पाच हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- (पाच हजार रूपये) |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी व सापळा दिनांक - दि. ११/११/२०२१<br>ठिकाण:- येरवडा येथील कचरा डेपोच्या आवारात<br>यातील तक्रारदार हे वैयक्तिक टेम्पोने येरवडा भागात कचरा उचलतात व येरवडा कचरा डेपो येथे टाकतात. कचरा उचलून येरवडा कचरा डेपो येथे टाकण्यासाठी टेम्पो सुरू ठेवण्याकरिता आरोपी लोकसेवक क्र. १ यानी तक्रारदार यांचेकडे दर महिना ५,०००/- रूपयांची लाच मागणी करून ५,०००/- रूपयांची लाच रक्कम आरोपी क्रमांक २ याचेकरवी स्वीकारल्यावर दोघांना ताब्यात घेण्यात आले असून येरवडा पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरु आहे.<br>ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.